जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३८० दिनांक - २४/०५/२०२३**

## खडकी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## टोळी प्रमुख कासीम उर्फ चित्ता बाबर बुरुज इराणी व त्याचे इतर २१ साथीदार यांचेविरूध्द मकोका कारवाई

दि.२१/०४/२०२३ रोजी रात्रौ १०/३० वा.फिर्यादी महिला यांचा भाऊ महमंद शौकत शेख यास आरोपी **कासीम उर्फ चित्ता बाबरबुरुज इराणी (टोळी प्रमुख) व त्याचे इतर २१ साथीदार** यांनी खाली पाडुन,जीवे मारण्याचा प्रयत्न करीत होते. त्यावेळी फिर्यादी हया सदरची झालेली भांडणे सोडविण्यासाठी मध्ये पडले असता त्यांनाही आरोपीत इसमांनी खाली पाडुन,त्यांचा विनयभंग केला होता. त्यातील महिला आरोपी सकिना फिरोज इराणी हीने फिर्यादी यांचे तोडांवर काटा चमच्याने मारहाण करुन जखमी केले होते. तसेच फिर्यादी यांचे भाऊ व मामे भाऊ यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने आरोपी यांनी त्याचे हातातील लोखंडी गज,हॉकी स्टीक,लोखंडी धारदार हत्याराने डोक्यात व डोळ्या जवळ मारहाण करुन गंभीर जखमी केले. त्यानंतर फिर्यादी यांना हॉकी स्टिकने मारून,दुखापत करुन आरोपीतांनी वस्ती मध्ये काचेच्या बाटल्या व दगडफेक करून,त्यांचे हाता मध्ये असलेल्या धारदार हत्यारे दाखवुन सदर परिसरात दहशत पसरविली. सदरबाबत **खडकी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.१२३/२०२३ भादविक ३०७,३५४,३२४,३२३,५०४,१४३,१४७,१४८,१४९, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५,सह क्रिमिनल लॉ अमेंडमेंट अँक्ट कलम ७** प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात निष्पन्न झालेले आरोपी **१)महम्मद हुसेन इराणी,वय-३३ वर्षे,रा.प्लॉट नं.८, महात्मा गांधी वसाहत,पाटील इस्टेट,शिवाजीनगर,पुणे २)गुलाबनबी हुसेन इराणी,वय-३० वर्षे,रा.सदर ३) सकिना फिरोज इराणी,वय-५० वर्षे,रा.सदर ४)सनोबर हुसेन इराणी,वय-५५ वर्षे,रा.सदर ५)कुल्सुम मोहम्मद शेख,वय-२८ वर्षे,रा.सदर ६)राणी हुसेन इराणी,वय-२५ वर्षे,रा.सदर ७)आमना उर्फ हमना याकुब इराणी,वय २७ वर्षे,रा.सदर ८)सैय्यदनुर जनशा इराणी,रा.सदर ९)रुक्साना सय्यदनुर इराणी,रा.सदर यांना अटक करण्यात आलेली असुन**,(टोळी प्रमुख) कासीम उर्फ चित्ता बाबरबुरुज इराणी याचेसह इतर आरोपीचा शोध सुरु आहे.

सदर आरोपी कासीम उर्फ चित्ता बाबरबुरुज इराणी (टोळी प्रमुख) याने त्याचेसह अन्य सदस्यांसाठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन,स्वतःची संघटीत टोळी तयार करून,अवैद्य मार्गाने अर्थिक फायदा मिळविण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी, संघटित गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकट्याने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करुन अथवा हिंसाचाराची धमकी देवुन किंवा धाकदपटशहा दाखवुन,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे,गंभीर दुखापत करणे,गुन्हा करण्यासाठी कट रचणे, नागरिकांच्या

मालमत्तेचे नुकसान करुन,तोडफोड करणे, बेकायदेशिर अग्नीशस्त्र जवळ बाळगणे, पोलीसांच्या आदेशाचा भंग करणे,सर्वसामान्य नागरिकांच्या मनात दहशत निर्माण करणे,बेकायदेशीर जमाव जमविणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे वारंवार केलेले आहेत. त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करून देखील सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटीतपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे बेकायदेशिरपणे आर्थिक फायदया करीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने,तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्हयात **महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४)** प्रमाणेचा अंर्तभाव करणे कामी खडकी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विष्णु ताम्हाणे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परि-०४,पुणे,श्री.शशिकांत बोराटे यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा यांना सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून खडकी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.१२३/२०२३ भादविक ३०७, ३५४,३२४,३२३,५०४,१४३,१४७,१४८,१४९,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५,सह क्रिमिनल लॉ अमेंडमेंट अँक्ट कलम ७ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयात **महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४)**प्रमाणेचा अंर्तभाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास **श्रीमती.आरती बनसोडे,मा.सहा.पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे शहर हे करीत आहेत.**

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परि-०४,पुणे,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे शहर,श्रीमती.आरती बनसोडे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विष्णु ताम्हाणे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.मानसिंग पाटील, निगराणी पथकाचे पोलीस उप-निरीक्षक,वैभव मगदुम व पोलीस अंमलदार यांनी केला आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही २५ वी कारवाई आहे.**